ISSN 2349-638x
Impact Factor 5.707

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 51

Executive Editor
Dr. Jaisingrao Deshmukh
Principal
Ramkrishna Paramhansa Mahavidyalaya,
Osmanabad. (M. S.)

Co-Editor

Mr. D. M. Shinde
Asso. Prof. & Head, Dept. of Sociology

Mr. M. U. Ugile
Asst. Prof, Dept. of Sociology

Chief Editor
Prof. Pramod Tandale

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 43 | पी.के. गायकवाड | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाययोजना | 116 |
| 44 | प्रा. डी.डी. गायकवाड | भारतातील बाल गुन्हेगारीची सद्य स्थिती | 119 |
| 45 | डॉ. ज्ञानोबा दशरथ फड | बालकामगारांच्या समस्या आणि प्रकार | 122 |
| 46 | प्रा.डॉ. नानासाहेब जाधव<br>प्रा. रवि सोळंके | भारतातील बालकामगार निर्मितीचे कारणे व परिणाम | 125 |
| 47 | प्रा. प्रदीप दाजीबा पाटील | भारतातील बालकामगारांची समस्या आणि उपाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास | 127 |
| 48 | श्रीमती शितल श्रीराम कोठावळे | बालकामगार एक सामाजिक समस्या | 130 |
| 49 | प्रा. शितल लहू बोडके | भारतातील बालकामगार निर्मितीची कारणे व शासकिय उपायेयाजना | 131 |
| 50 | प्रा. एस. एस. मोहिते | आधुनिक भारतातील बालकामगाराचे स्वरूप व घटनात्मक उपाययोजना | 134 |
| 51 | डॉ. आश्रुबा देविदास कदम | भारतातील आधुनिक बालकामगारांचे स्वरूप | 136 |
| 52 | प्रा. शरद शंकर गायकवाड | बालहक्क हिरावून घेणारी प्रथा बालकामगार आणि मानवअधिकार | 138 |
| 53 | प्रा. डॉ. यादव घोडके | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाययोजना | 140 |
| 54 | शिवाजी दिलीप पावले | बालकामगार एक सामाजिक समस्या | 143 |
| 55 | प्रा. एस.एन. पाटील | बालगुन्हेगारी: एक भिषण समस्या | 145 |
| 56 | प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | बालकामगाराचे पुनर्वसन आणि शासनाची भूमिका | 147 |
| 57 | प्रा.डॉ. जयसिंग ज्ञानदेव साळुंके | बालगुन्हेगार : सुधारकार्यक्रम | 150 |
| 58 | प्रा.डॉ.आर.डी. खताळ | बालकामगार समस्येची कारणे आणि परिणाम | 153 |
| 59 | प्रा.अशोक रामचंद्र गोरे | आधुनिक भारतातील बालकामगार समस्येचे स्वरुप | 155 |




Scanned with OKEN Scanner

# बालकामगाराचे पुनर्वसन आणि शासनाची भूमिका

**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड**
समाजशास्त्र विभाग,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

भारतात आणि महाराष्ट्रात बालकामगार मोठया प्रमाणात दिसून येते. बालकामगारांच्या अनेक समस्या कुटुंबातून निर्माण होतात तर काही पारंपारिक जीवन पध्दतीच्या जोखडातून बाहेर पडण्यासाठी तयार नसलेल कुटूंब अत्यंत दारिद्र्यमय जीवन जगण्यातच समाधानी मानतात. परंतु काळाच्या ओघात सर्व सुविधा पासून वंचित असलेल्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करुन बालकामगाराचे पुनर्वसन करणे फार गरजेचे आहे. यासाठी शासनाची व सरकार मधील सत्ताधिशांची भूमिका निश्चितच महत्वपुर्ण असते. जर या व्यवस्थेनी ठरविले तर बालकामगाराची समस्या समूळ नष्ट देखील होऊ शकते. यामध्ये शासन, सरकार, स्वंयसेवी संस्था यांनी प्रयत्न केले तर बालकामगाराचे प्रमाण कमी होऊन हळूहळू या समस्येचे निर्मूलन करता येईल. भारतात आज बाल कामगार हे बाल मजुरांच्या नावाने औद्योगिक क्षेत्र तसेच इतर काही ठिकाणी काम करीत असलेला दिसून येतो. बाल कामगार ही समस्या फक्त भारतातच आहे, असे नाही तर ही समस्या जागतिक असून प्रत्येक देशात वेगवेगळया कारणाने, वेगवेगळया काळात निर्माण झालेली आहे. सरकारी धोरणानुसार वय वर्षे १४ च्या आतील सर्व मुला-मुलींना बालकामगार म्हणता येईल. वय वर्षे १४ च्या आतील सर्व मुला-मुलींना कामावर ठेवणे कायदेशीर गुन्हा आहे. असे असतांनाही आज भारतामध्ये कित्येक ठिकाणी बालकामगार हा कुंटुबाची आणि स्वत:ची खळगी भरण्यासाठी काम करीत असलेला दिसून येतो.

देश पातळीवर बालकांना मोफत शिक्षण अथवा अन्य सुविधा दिल्यानंतर देखील अर्धवेळ शाळा करणारे आणि शाळा बाह्य मुले ही दिवसातून काही वेळ कामाला जातात आणि बहूसंख्य बालक पुर्ण वेळ काम करतात. आज भारतामध्ये दुष्काळासारखे अनेक आव्हाने दर वर्षी येऊ लागली आहेत. त्यामुळे अत्यंत गरीब आणि मागास कुटुंबातील मुले ही जगण्यासाठी का होईना, ते कोठे तरी कामाला जात असलेला दिसून येतो. परंतु त्या ठिकाणी त्या बालकांचे कमी अधिक प्रमाणात शोषण होत असलेला दिसून येते. म्हणून राज्य आणि देश पातळीवर त्या बाल कामगारांना न्याय मिळण्यासाठी शासनाच्या वतीने महत्वाची भुमिका पार पाडून त्या लहान बालकांना सक्षम जीवन जगण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या वेगवेगळया योजना व सुविधा उपलब्ध करुन त्या बालकांना मुख्य प्रवाहात आणणे फार गरजेचे आहे. त्यासाठी शासनाची भुमिका फार महत्वाची असून ती शासनाच्या सर्व स्तरातून जर राबविले गेले तर निश्चितच बाल कामगार आणि बालकामगारांच्या समस्या पुढील भविष्य काळात निर्माण होणार नाही.

**संशोधनाचा उद्देश :**

१. बालकामगाराची संकल्पना समजून घेणे.
२. बालकामगारांच्या समस्या आणि आव्हाने यांचा अध्ययन करणे.
३. बालकामगारांविषयी शासनाची भुमिका समजून घेणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. बालकामगाराचे पुनर्वसन करण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे.
२. बालकामगाराच्या सर्वांगिण विकासाठी शासनाची भूमिका महत्वाची असते.
३. बालकामगारांना न्याय पुर्ण वागणूक दिल्यास त्यांच्या समस्या आणि आव्हाने कमी होऊ शकते.

**तथ्य संकलनाची साधने :**

तथ्य संकलनाची साधने म्हणून या शोधनिबंधासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. यामध्ये कळंब या शहरातील बालक जे की छोटया-मोठया व्यवसायिकाकडे बाल मजुरी किंवा बाल कामगार म्हणून काम करीत असलेले दिसून येते. या बालकामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तसेच आजच्या बालकांच्या समस्या आणि त्या बालकापुढील आव्हानात्मक परिस्थिती या संशोधनात्मक विषयांचा अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. या साठी निरीक्षण पध्दत, मुलाखत, सामूहिक चर्चा, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ इ. साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**बाल कामगार/बाल मजुरी अर्थ आणि स्वरुप :**

गरीबी, बेकारी, लाचारी, दारिद्रय, आकस्मिक संकट, युध्द, भूकंप, महापूर अपघात अशा अनेक कारणांमुळे लोकांवर अचानक संकटे येतात. लोक बेघर होतात, अनेक मुले अनाथ होतात. निराधार झालेली अशी मुले पोट भरण्यासाठी मोलमजुरी करु लागतात व त्यांचे उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पार धुळीत मिळते. याशिवाय आई-वडील गरीब असल्यास ते मुलांना शाळेत पाठविण्यास समर्थ नसतात. शाळेचा खर्च ते सहन करु शकत नाही. अशावेळेस कुटुंबाला थोडीफार आर्थिक मदत मिळावी म्हणून पालक आपल्या मुलांना वेगवेगळया ठिकाणी कामावर पाठवीत असतात आणि इथूनच बालमजुरीची सुरुवात होते. या विचारातून बालकामगारांची व्याख्या समजून घेणे गरजेचे आहे, ते पुढीलप्रमाणे.



Scanned with OKEN Scanner

"बालकामगार म्हणजे मानसिक, शारीरिक, सामाजिक, नैतिकदृष्ट्या धोकादायक व ज्यामुळे शिक्षणात खंड पडेल, किंवा व्यत्यय येत असेल अशा कामामध्ये सहभागी बालक"

"बालमजुरांमध्ये अपरिपक्व वयात प्रौढासारखे जीवन जगणाऱ्या मुलांचा समावेश होतो. आरोग्याला तसेच मानसिक आणि शारीरिक हानिकारक परिस्थितीमध्ये, तुटपुंज्या वेतनावर त्यांना तासनतास काम करावे लागते, बऱ्यांच जणांना कुटुंबापासून दूर रहावे लागते. उज्वल भविष्यासाठी अर्थपूर्ण शैक्षणिक संधीपासून बऱ्याच वेळा अशी मुले वंचित राहतात" -- आंतरराष्ट्रीय कामगार संघटना बालमजुरी निर्मूलन : राज्य कृती आराखडा, महाराष्ट्र शासन २००७ प्रमाणे---

"शाळेत न जाणारी ५ ते १४ वयोगटातील सर्व मुले बालमजुरच असतात. मुलांनी शाळेत नसणं म्हणजे असह्य, धोकादायक परिस्थितीत एकूण विकास व वृध्दीला हानीकारक कामात व्यग्र राहण्यासारखेच आहे. त्यामुळे ती बालमजुरीच आहे"

बाल मजुरी किंवा बाल कामगार हा मानवाधिकाराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. बालकामगार म्हणून ज्या मुलांचा आपण विचार करतो त्याबद्दल सांगायचे झाले तर ५ ते १४ वयोगटातील दिवसाच्या कोणत्याही वेळी कुटुंबात किंवा कुटुंबाच्या बाहेर मोबदल्यासाठी किंवा विनामोबदला म्हणून काम करतात त्यांना बाल कामगार किंवा बाल मजूर म्हणतात.

बालकामगार ही समाजातील घातल प्रथा आहे. समाजातील आर्थिक व सामाजिक व्यवस्थेमुळे बालकांना कष्टप्रद जीवन जगावे लागत आहे. बालकामगार ही संकल्पना बहूआयामी स्वरुपाची आहे. या मध्ये अनेक श्रेणीच्या बालकामगारांचा समावेश होतो. डॉ. वाल्टर फर्नांडीसच्या मताप्रमाणे बालश्रम हे असहाय्य, दुर्गुण आहेत किंवा कठोर वास्तवता आहे. ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे ज्याचा बालकांवर गंभीर दुष्परिणाम होतो. अविकसित, विकसनशील देशात बालक आणि त्यांच्या सेवा हया वस्तू समजल्या जातात, अशी मुले अन्यायाचे बळी ठरतात. दारिद्रय आणि अन्य कारणांमुळे अशा बालकांचे मोठया प्रमाणात मालकांकडून शोषण केले जाते. त्यांना अमानवी वागणूक दिली जाते. लैंगिक शोषण केले जाते. कामाच्या ठिकाणच्या धोकादायक वातावरणामुळे बालकांच्या शारिरीक, भावनात्मक विकासाला धोका पोहोचतो. प्रतिकूल कामाच्या स्थितीमुळे त्यांना आराम मिळत नाही, त्यांची कार्यशक्ती कमी होते, कारण हस्तउद्योग, छोटे उद्योग व इतर वाणिज्य उद्योगात आर्द्रता, अंधार, अपुरा उजेड, त्याचा मुलांच्या वाढीवर, विकासावर आणि आरोग्यावर आत्यंतिक प्रतिकूल दुष्परिणाम होतो.

## बाल कामगार समस्या आणि आव्हाने :

भारतात बालकांच्या समस्या आजच्या आधुनिक युगात आपणास पाहावयास मिळते. भारतातच नव्हे तर बालकांच्या समस्या या कमी अधिक प्रमाणात इतर अन्य देशात ही दिसून येते. साधारणपणे बालकामगार हा संघटीत आणि असंघटीत क्षेत्रात काम करीत असलेला दिसून येतो. बालकामगार हे बांधकाम, हॉटेल, ढाबे, घरकाम, कारखाने, मळा, शेती, मशागत, खाणकाम, वेगवेगळया अवैध व्यवसायातही या बालकांचा वापर केल्या जातो. साधारणपणे असे म्हणता येईल की, बालकामगार हे वेगवेगळया स्तरातून निर्माण होतात. कारण की या बालकांच्या कुटुंबाची एकूण आर्थिक परिस्थिती ही खुपच हालाखीची असल्यामुळे हे बालक आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी घर सोडून इतरत्र कोणत्याही ठिकाणी कामाला जातात. म्हणून या बालकांना वेगवेगळया समस्येला तोंड घ्यावे लागते. या समस्येमुळे बालकांना होणारा त्रास फार गंभीर स्वरुपाचे असते. कारण की त्याच्या संपूर्ण आयुष्यातील संधी ही गेलेली असते. मजुरी करणारा बालक आणि त्याच्या समस्या आपल्या नजरेसमोर ठेवल्यास हे स्पष्ट दिसून येते की, यामुळे त्या बालकांचे कुपोषण, त्याची निर्माण होणारी रोगग्रस्त पिढी, कामाच्या ठिकाणी शारिरीक अवयवाचे नुकसान किंवा अवयव गमावणे, अमानवीय वागणूक, अत्याधिक कामाची जबाबदारी, अधिकारांची कमतरता, प्रौढांच्या बेकारीत वाढ, सामाजिक विकास खुंटणे, आत्मविश्वास, आत्मसन्मान व महत्त्वकांक्षा गमावणे इ. अनेक व्याधींनी तो सामान्य बालक स्वतःच्या विकासापासून खुप दुर गेलेला असतो. कारण की अशा अनेक कारणामुळे त्या बालकांना वेगवेगळया स्वरुपाचे काम करावे लागते. जेव्हा तो समाजात राहतो तेव्हा त्या समाजात खऱ्या अर्थाने सन्मानाची वागणूक मिळेलच याची खात्री नसते. त्या बालकांकडे बघण्याचा मानवी दृष्टिकोन थोडा वेगळाच दिसून येतो. कारण त्याचे अठरा विश्व दारिद्रय आणि कुटुंबाची दयनीय अवस्था या मुळे समाजात त्या व्यक्ती समुहाला वेगळया दृष्टिने पाहिले जाते.

**कार्ल मार्क्सच्या परात्मतेच्या सिध्दांतावरुन असे म्हणता येईल की,** "श्रमापासून मिळणारे समाधान आणि आनंदापासून दूर जाणे म्हणजेच परात्मता होय. भांडवलशाही उत्पादन पध्दतीमध्ये कामगार केवळ भांडवलदारासाठी श्रम करतो. त्याचा मोबदला त्याला पैशात मिळतो आणि श्रमाच्या आनंदाला तो पारखा होतो. हाच परात्मतेचा अर्थ मार्क्सला अभिप्रेत आहे." आज खरोखरच ही स्थिती निर्माण झालेली आहे. कारण की, पुर्वी कामगाराला त्याच्या कामाबद्दल आनंद आणि समाधान वाटायचा. परंतु आज याच्या विरुध्द आहे. कारण कोणताही कामगार त्याच्या कार्य कुशलतेनी बाजार मुल्य वस्तू निर्माण करतो पण त्याला त्याच्या कार्याची पावती मिळत नाही. मिळते फक्त त्याच्या कामाचा मोबदला. पण त्यांनी निर्माण केलेली वस्तु ही भांडवलदार खुप नफा घेवून विकतो. याचाच अर्थ या ठिकाणी कामगार शोषण होत असते. अशा शोषणाविरुध्द लढा उभारुन होत असलेले अन्याय थांबविले पाहिजे.

## बाल कामगारांच्या समस्या आणि आव्हाने :

कळंब हा तालुका उस्मानाबाद जिल्हयातील असून या तालुक्यात इतर तालुक्यापेक्षा बाजारपेठ आणि इतर सोयी सुविधा चांगल्या प्रकारच्या दिसून येते. बालकांना शैक्षणिक सुविधा या ठिकाणी उपलब्ध आहेत. परंतु या तालुक्यात वेगवेगळया जाती जमातीचे लोक राहत असून ते आजही मुख्य प्रवाहात आलेले नाहीत. तसेच ते स्वतः ही स्वतःचे विकास करुन घेण्यास तयार नाहीत. उस्मानाबाद जिल्हयात जाती-जमाती पैकी प्रामुख्याने पारधी जमातीची लोकसंख्या आहे. त्यापैकी जवळपास लहान-मोठी एकूण ६० वस्ती या जमातीच्या आढळून येतात. पारधी जमातीच्या बालकांना आजच्या २१ व्या शतकात देखील शैक्षणिक क्षेत्रातील विकासाच्या बाबतीत पुढे



Scanned with OKEN Scanner

घेण्याची संधी मिळालेली दिसून येत नाही. हा समाज आजही शिक्षणापासून खुप दुर असलेला दिसून येतं. पारधी समाज असेल किंवा इतर भटक्या विमुक्त जाती-जमातीतील बालकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला दिसून येत नाही. कारण की, वेगवेगळया जाती-जमातींची गुन्हेगारी जमात म्हणून ओळख असल्यामुळे उच्चभ्रू समाजातून वेगवेगळया जमातीचे सामाजिक शोषण होत असते. त्याचाच एक भाग म्हणजे बालकामगार आणि या बालकामगाराचे शोषण याच विचारधारेतून होत असेल असे मला या प्रसंगी वाटत आहे. म्हणून शासनाची जबाबदारी आहे की, एखाद्या मागास कुटुंबाला असेल किंवा समूहाला प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या सोयी-सुविधा देवून त्या घटकामध्ये परिवर्तन घडवून त्यांच्या कुटुंबातील लहान बालकांना बालकामगार म्हणून काम न करण्याची सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था शासनाच्या माध्यमातून करणे गरजेचे आहे. त्यांना शिक्षणाच्या वेगवेगळया संधी देवून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे महत्वाचे ठरते.

बालकांच्या समस्या आणि आव्हाने हा विषय हाताळत असताना माझ्या समोर अनेक प्रश्न निर्माण झाले. कारण की, साधारणपणे बालकांच्या समस्या या अत्यंत गरीब आणि दैनंदिन जीवन जगण्यास हतबल झालेल्या कुटुंबातील मुलांसमोरच निर्माण होतात. परंतु त्याच बरोबर इतर काही कारण असे आहेत की, कुटुंबातील वडील मंडळी एक तर व्यसनाधीन असते किंवा त्यास जुगार किंवा मटका तसेच पत्ते खेळणे आणि इतर काही कुटुंबातील कलह या मुळे त्या घरामध्ये बालकांचा परिपुर्ण विकास होत नाही. तसेच त्यांना भविष्यकालीन सुविधा दिले जात नाही. त्यामुळे त्या बालकांना वेगवेगळया समस्या आणि आव्हानाला सामोरे लागते.

समकालीन समाज व्यवस्थेत माणूस जरी बदलत चाललेला असेल, परंतु समाजातील विषमता मात्र कमी झालेली नाही. गरीब हा गरीबच होत आहे आणि श्रीमंत हा श्रीमंतच होत आहे. म्हणून समानतेसाठी वैचारिक संघर्ष होणे गरजेचे आहे. असे घडून येण्यासाठी त्या सामान्य लोकांमध्ये वैचारिक परिवर्तन होणं गरजेचे आहे. असे झाल्यास त्या ठिकाणी समाजवादी विचार निर्माण होईल आणि त्या अत्यंत गरीब आणि मागास कुटुंबातील बालकांना कोणत्याही समस्येला तोंड द्यावे लागणार नाही. फ्रेंच राज्यक्रांती जर समजून घेतले तर हे लक्षात येते की, अन्यायाविरुध्द सामान्य जनतेनी लढा दिला आणि त्या देशात परिवर्तन घडवून आणले. तसेच भारतात परिवर्तनाची गरज आहे. कारण की, पिढयानं पिढया या देशात गरीब आणि मागास समाजावर अन्याय होत आलेला आहे. म्हणून परिवर्तनासाठी आणि न्याय तसेच हक्काची मागणी करण्यासाठी एकत्र येवून लढा देणे गरजेचे आहे. तेव्हा मात्र या देशातील बालक सुखी आणि भविष्यातील देशाचा आधारस्तंभ म्हणून पुढे येऊ शकतो. त्याकरीता देश पातळीवर बालकांच्या विकासासाठी भरीव कार्य होणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

राष्ट्र आणि राज्य पातळीवर पारंपारिक ते आधुनिक समाज व्यवस्थेत गरीब-श्रीमंत अशी समाजरचना तयार होती. परंतु काळानुसार बदल होईल असे वाटत असतांना तसे घडले नाही. कारण की, उच्चभ्रू समाजातून कनिष्ठ समाजाचे शोषण नियमित पणे वेगवेगळया पातळीवर केले जात असते. भांडवलदार- कामगार जशी व्यवस्था निर्माण झाली ती तशीच कायमस्वरुपी या देशात स्थिरावलेली दिसून येते. या व्यवस्थेत कामगाराचे शोषण मात्र आटळ आहे. तसेच आजच्या समाज व्यवस्थेत कोणत्याही ठिकाणी काम करणारा बालकामगार याचे शोषण मात्र त्या ठिकाणी निश्चितच होत असते किंवा केल्या तरी जाते. म्हणून कालकामगाराचे पुनर्वसन करणे, त्याच्यात परिवर्तन घडवून आणणे, त्यांना शासकीय सोयी-सुविधा देणे तसेच मोफत शिक्षणाबरोबर इतर सर्व सुविधा देवून सक्षम बनविण्यासाठी शासनानी महत्वाची जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे. शासनाची भूमिका शासन व शासनाच्या सेवेतील सर्व अधिकरी, कर्मचारी व सरकार दरबारी नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींनी तसेच स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून या समस्येचे समूळ निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहे. यामुळे काही काळानंतर बालकामगार ही समस्या आपणास खुप कमी प्रमाणात दिसून येईल.

**राष्ट्रपतीच्या वाढदिवसानिमीत्य**, राष्ट्रपतीच्या हस्ते बालमजुरी प्रतिबंधक मोहिमेस प्रारंभ करण्यात आले आहे. नोबेल पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांच्या सत्यार्थी चिल्ड्रन्स फाऊंडेशनच्या वतीने हंड्रेड मिलियन फॉर हंड्रेड मिलियन कॅम्पेन आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रपतीचे म्हणणे- जगाने विज्ञान-तंत्रज्ञानासह अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. परंतु मानवी पातळीवर बालमजुरी सारखी प्रथा अनुनही पाहायला मिळते, हे दुर्दैव आहे. मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी कोणताही विलंब न करता या क्षेत्रात कार्य करण्याची गरज आहे.

कौटुंबिक आणि सरकारी प्रयत्नांचा सुवर्णमध्य गाठणे महत्वाचे आहे. ते जिथे झाले तिथे तितके यश मिळाले. एकूण महाराष्ट्राच्या बालकांच्या समस्या हया अनेक आहेत. यापैकी बालमजुरी, कुपोषण अशा समस्या मोठया प्रमाणात आहेत. यावर मात करुन बालकांचे होणारे शोषण कमी केले पाहिजे आणि बालकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे.

अशाप्रकारे बालकांच्या समस्या आणि आव्हाने असून या घटकाला समस्या मुक्त करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले पाहिजे. राज्य, राष्ट्र पातळीवर बालकांच्या गुणवत्ता विकास उपक्रम राबवून परिवर्तन केले पाहिजे.

**संदर्भ :**


१. गायकवाड ज्याती, बालविकास शास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९६
२. वर्तमानपत्र, मासिके, संशोधनपत्रिका
३. आगलावे प्रदिप, समाजशास्त्रीय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७
४. वाणी उमेश, बाल मजुरी आणि कृषी क्षेत्र-एक दृष्टीक्षेप, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१४
५. इंटरनेट वरील माहिती




Scanned with OKEN Scanner